जनसंपर्क कक्ष
0 8 MAR 2023
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठात सोमवारी "महान शिवाजी" महाग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार-संपादक, खासदार कुमार केतकर आणि शाहू महाराज यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि वसंत आपटे उपस्थित होते.

# बाळकृष्ण यांनी मांडलेले शिवाजी महाराज सामान्यांपर्यंत पोहोचवा

## कुमार केतकर : 'महान शिवाजी' महाग्रंथाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : डॉ. बाळकृष्ण यांच्यासारख्या इतिहासकारांनी मांडलेले छत्रपती शिवाजी महाराज सामान्य माणसापर्यंत पोहोचवा, असे आवाहन ज्येष्ठ संपादक खासदार कुमार केतकर यांनी सोमवारी येथे केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर शंभर वर्षांनी अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध झाले. लोकशाहीची संकल्पना जगात अस्तित्वात नसण्याच्या कालखंडात शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात 'रयतशाही' स्थापन केली होती, त्यातून त्यांचे मोठेपण सिद्ध होत असल्याचे खासदार केतकर यांनी सांगितले.

डॉ. बाळकृष्ण लिखित 'शिवाजी द ग्रेट' या चार खंडांच्या ग्रंथाचा मराठी अनुवाद 'महान शिवाजी' या नावाने वसंत आपटे यांनी केला आहे. याचे संपादक डॉ. जयसिंगराव पवार आहेत. या महाग्रंथाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्रामार्फत केतकर यांच्या हस्ते राजर्षी शाहू सभागृहात झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

### विद्यापीठ स्थापनेत बालकृष्ण यांचेही योगदान

डॉ. जयसिंगराव पवार यांनी डॉ. बाळकृष्ण आणि छत्रपती राजाराम महाराज यांचे शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेमधील योगदान यावेळी अधोरेखित केले.

केतकर म्हणाले, इतिहास आणि भूगोल यापेक्षा आपली तरुणाई आयटी आणि आयआयटीच्या अभ्यासाकडे लक्ष देते आहे. असे 'आधुनिक अशिक्षित' देशात निर्माण होत आहेत. त्यामुळे हा इतिहास त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याची गरज निर्माण झाली आहे. 'महान शिवाजी' हा मूळ ग्रंथ ज्यांनी दोन दशके अभ्यास करून लिहिला, त्या डॉ. बाळकृष्ण यांचे योगदान विद्यार्थ्यांत इतिहासाबद्दल आस्था निर्माण करीत नाही, तोवर ध्यानी येणार नाही.

शाहू महाराज म्हणाले, डॉ. बाळकृष्ण यांनी महाराजांना 'शिवाजी द ग्रेट' असे संबोधून अलेक्झांडरच्या तोडीचे त्यांचे कार्य असल्याचे प्रथमच निदर्शनास आणून दिले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी डॉ. बाळकृष्ण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमाला सुरू करण्याची घोषणा केली. यावेळी अनुवादक वसंत आपटे यांनीही मनोगत तर देविकाराणी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

08 MAR 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जनमानसातील इतिहासाची उपेक्षा दूर होण्याची गरज

प्रतिनिधी
कोल्हापूर

■ ज्येष्ठ संपादक पद्मश्री खासदार कुमार केतकर यांचे प्रतिपादन : 'महान शिवाजी' ग्रंथाचे प्रकाशन



ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार संपादीत 'महान शिवाजी' ग्रंथाचे प्रकाशन करताना पद्मश्री खासदार कुमार केतकर, श्रीमंत शाहू छत्रपती, डॉ. जयसिंगराव पवार, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.

जनमानसातील इतिहासविषयक उपेक्षेची भावना दूर करण्यासाठी त्यांच्या मनातील आदर्श व्यक्तीमत्त्वांच्या चरित्रांचा आधार घ्यायला हवा, असे प्रतिपादन ज्येष्ठ संपादक, 'पद्मश्री' खासदार कुमार केतकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्राच्या वतीने डॉ. बाळकृष्ण लिखित 'शिवाजी द ग्रेट' या चार खंडांच्या महाग्रंथाचे डॉ. जयसिंगराव पवार यांनी मराठीत संपादन केलेले 'महान शिवाजी' या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा झाला. हा सोहळा विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात झाला. याप्रसंगी वक्ते म्हणून केतकर बोलत होते. श्रीमंत शाहू छत्रपती, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

केतकर म्हणाले, इतिहास काळजीपूर्वक पुढे घेऊन जाण्याची गरज आहे. 'महान शिवाजी' या ग्रंथाचे मूळ लेखक डॉ. बाळकृष्ण सध्या पाकिस्तानात असलेल्या मुल्तानचे होते. डॉ. बाळकृष्ण महाराष्ट्रवासी झाले, ते कायमचेच. शिवरायांवर अस्सल साधनांनिशी चरित्र लिहून ते पूर्णत्वास नेले. सार्वभौम स्वराज्याची संकल्पना जागतिक स्तरावर नसताना शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केले. छत्रपती शिवाजी महाराज यांचे रयतेच्या दृष्टीने काय योगदान होते, त्याची सातत्याने चर्चा होण्याची गरज आहे. तत्कालिन ६५० संस्थानिकांपैकी एकाला सुद्धा आपले आरमार असावेसे वाटले नाही. त्यांना सागरावरील अधिपत्याची आवश्यकता जाणवली हे त्यांचे सर्वात मोठे वेगळेपण आहे.

श्रीमंत शाहू छत्रपती महाराज म्हणाले, डॉ. बाळकृष्ण यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे विविध संदर्भसाधनांचा अभ्यास करून विस्तृत चरित्र साकारले. महाराजांना 'शिवाजी द ग्रेट' असे संबोधून त्यांचा सन्मान वाढवला. शंभर वर्षांपूर्वी शिवाजी महाराजांचे नाव घेईल, तो ब्रिटीशांचा शत्रू असे चित्र होते. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी थेट प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हातूनच शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची पायाभरणी करून हा समज दूर केला.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, डॉ. बाळकृष्ण यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तीमत्त्वाचे अनेक पैलू संदर्भ लिहिले आहेत. मराठा आरमाराचे जनक, हिंदी राष्ट्रीयत्वाचे प्रेरणास्थान आणि भारतीय स्वातंत्र्याचा ध्रुवतारा अशी महाराजांविषयीची वर्णने डच कागदपत्रांमध्ये सतराव्या शतकामध्येच आढळतात. इंग्लीश, फ्रेंच, डच, पोर्तुगीज कागदपत्रांच्या आधारे त्यांनी महाराजांचे मोठेपण अधोरेखित केले आहे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. बाळकृष्ण यांच्या स्मृतिप्रित्यर्थ व्याख्यानमाला सुरू केली जाईल. त्याचप्रमाणे 'महान शिवाजी' हा ग्रंथ राज्यातील सर्व विद्यापीठांना पाठविण्यात येईल. अनुवादक वसंत आपटे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. देविकाराणी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी आभार मानले. यावेळी शिवप्रेमी नागरिक, अभ्यासक, संशोधक आदी उपस्थित होते.

0 8 MAR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जनमानसातील इतिहासाबाबतची उपेक्षा दूर करणे आवश्यक

## कुमार केतकर : ‘महान शिवाजी’ अनुवादित ग्रंथाचे शिवाजी विद्यापीठात प्रकाशन

कोल्हापूर, ता. ७ : जनमानसातील इतिहासविषयक उपेक्षेची भावना दूर करण्यासाठी त्यांच्या मनातील आदर्श व्यक्तिमत्त्वांच्या चरित्रांचा आधार घ्यायला हवा. इतिहासाच्या अभ्यासासाठी देशात पोषक वातावरण निर्माण होणे अत्यंत आवश्यक असून, त्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. इतिहास हा मुद्दा आपण अत्यंत काळजीपूर्वक पुढे घेऊन जाण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार आणि खासदार कुमार केतकर यांनी सोमवारी येथे केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी ‘महान शिवाजी’ महाग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार, खासदार कुमार केतकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शेजारी (डावीकडून) डॉ. जयसिंगराव पवार, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, वसंत आपटे उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्रातर्फे डॉ. बाळकृष्ण लिखित ‘शिवाजी द ग्रेट’ या चार खंडांच्या महाग्रंथाचा मराठी अनुवाद ‘महान शिवाजी’ या नावाने करण्यात आला आहे.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार ग्रंथाचे संपादक असून, वसंत आपटे अनुवादक आहेत. या ग्रंथाचे प्रकाशन विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झाले. त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून श्री. केतकर बोलत होते. कार्यक्रमास श्रीमंत शाहू छत्रपती महाराज प्रमुख उपस्थित, तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

केतकर म्हणाले, ‘महान शिवाजी’ हा मूळ ग्रंथ ज्यांनी लिहिला, त्या डॉ. बाळकृष्ण यांचे मूळ मुलतान आहे, जे सध्याच्या पाकिस्तानात आहे. पण, ते पाकिस्तानात आहे म्हणून त्या ठिकाणाचा द्वेष करण्याचे कारण नाही. कारण इतिहासात मुलतान हे बौद्ध, जैन, हिंदू या सर्वच परंपरांचे पवित्र ठिकाण होते, पण इतिहासाच्या ज्ञानाअभावी ते आपल्या द्वेषाला कारण ठरते. तसे होऊ नये. तेथून महाराष्ट्रात येऊन डॉ. बाळकृष्ण महाराष्ट्रवासी झाले, ते कायमचेच. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ते इतके प्रेमात पडले की, त्यांचे अस्सल साधनांनिशी चरित्र लिहिणे, हे त्यांनी आपले जीवितकार्य मानले आणि पूर्णत्वास नेले. जोपर्यंत आपण विद्यार्थ्यांत इतिहासाबद्दल आस्था निर्माण करीत नाही, तोवर बाळकृष्णांचे योगदान त्यांच्या ध्यानी येणार नाही.’

श्रीमंत शाहू छत्रपती महाराज म्हणाले, ‘डॉ. बाळकृष्ण यांनी शिवाजी महाराजांचे विविध संदर्भ साधनांचा वापर करून पहिलेच विस्तृत चरित्र साकारले. महाराजांना ‘शिवाजी द ग्रेट’ असे संबोधून जगज्जेता अलेक्झांडरच्या तोडीचे त्यांचे कार्य असल्याचे प्रथमच निदर्शनास आणून दिले. शंभर वर्षांपूर्वी शिवाजी महाराजांचे नाव घेईल, तो ब्रिटिशांचा शत्रू, असे एक चित्र होते. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी थेट प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हातूनच शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची पायाभरणी करवून घेऊन त्यांच्याभोवतीचे हे अप्रसिद्धीचे कडे भेदले.’

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, ‘डॉ. बाळकृष्ण यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तीमत्त्वाचे अनेक पैलू संदर्भ सामोरे आणले आहेत. मराठा आरमाराचे जनक, हिंदी राष्ट्रीयत्वाचे प्रेरणास्थान आणि भारतीय स्वातंत्र्याचा ध्रुवतारा अशी महाराजांविषयीची वर्णने डच कागदपत्रांमध्ये सतराव्या शतकामध्येच करण्यात आली आहेत. ती बाळकृष्ण येथे सविस्तर मांडतात.’

वसंत आपटे यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. देविकाराणी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी आभार मानले.

### राज्यातील सर्व विद्यापीठांना ग्रंथ पाठविणार

■ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, ‘या वर्षीपासून डॉ. बाळकृष्ण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमाला सुरू करण्यात येईल. ‘महान शिवाजी’ हा ग्रंथ राज्यातील सर्व विद्यापीठांना विशेष दूताकरवी पाठविण्यात येईल.’

0 8 MAR 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इतिहासाची उपेक्षा दूर करणे आवश्यक

## कुमार केतकर : 'महान शिवाजी' महाग्रंथाचे शिवाजी विद्यापीठात प्रकाशन

कोल्हापूर : प्रतिनिधी

जनमानसातील इतिहासविषयक उपेक्षेची भावना दूर करण्यासाठी त्यांच्या मनातील आदर्श व्यक्तिमत्त्वांच्या चरित्रांचा आधार घ्यायला हवा, असे प्रतिपादन 'पद्मश्री' खासदार कुमार केतकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्रातर्फे डॉ. बाळकृष्ण लिखित 'शिवाजी द ग्रेट' या चार खंडांच्या महाग्रंथाचा मराठी अनुवाद 'महान शिवाजी' या नावाने करण्यात आला आहे. डॉ. जयसिंगराव पवार संपादक असून वसंत आपटे अनुवादक आहेत. याचा प्रकाशन समारंभ सोमवारी विद्यापीठात आयोजित करण्यात आला. त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून केतकर बोलत होते.

कुमार केतकर म्हणाले, इतिहास हा मुद्दा आपण अत्यंत काळजीपूर्वक पुढे घेऊन जाण्याची गरज आहे.



कोल्हापूर : 'महान शिवाजी' महाग्रंथाचे प्रकाशन करताना ज्येष्ठ संपादक, खासदार कुमार केतकर. सोबत डॉ. जयसिंगराव पवार, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व वसंत आपटे.

'महान शिवाजी' हा मूळ ग्रंथ ज्यांनी लिहिला, त्या डॉ. बाळकृष्ण यांचे मूळ मुलतान आहे, जे सध्याच्या पाकिस्तानात आहे; पण ते पाकिस्तानात आहे म्हणून त्या ठिकाणाचा द्वेष करण्याचे कारण नाही. कारण इतिहासात मुलतान हे बौद्ध, जैन, हिंदू या सर्वच परंपरांचे पवित्र ठिकाण होते. तेथे त्यांच्या यात्रा भरत; पण इतिहासाच्या ज्ञानाअभावी ते आपल्या द्वेषाला कारण ठरते. तसे होऊ नये. तेथून महाराष्ट्रात येऊन डॉ. बाळकृष्ण महाराष्ट्रवासी झाले, ते कायमचेच. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ते इतके प्रेमात पडले की, त्यांचे अस्सल साधनांनिशी चरित्र लिहिणे, हे त्यांनी आपले जीवितकार्य मानले आणि पूर्णत्वास नेले.

यावेळी श्रीमंत शाहू छत्रपती महाराज म्हणाले, शिवाजी महाराजांचे विविध संदर्भसाधनांचा वापर करून पहिलेच विस्तृत चरित्र साकारले. महाराजांना 'शिवाजी द ग्रेट' असे संबोधून जगज्जेता अलेक्झांडरच्या तोडीचे त्यांचे कार्य असल्याचे प्रथमच निदर्शनास आणून दिले.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, डॉ. बाळकृष्ण यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू सहसंदर्भ सामोरे आणले आहेत. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, या वर्षीपासून डॉ. बाळकृष्ण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमाला सुरू करण्यात येईल. यावेळी वसंत आपटे यांनीही मनोगत व्यक्त केले.

0 8 MAR 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सात मंडळांच्या अध्यक्षांची निवड मतदानाने

## १५ मंडळे बिनविरोध : विद्यापीठातील अभ्यास मंडळाच्या निवडी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यास मंडळांचे अध्यक्ष सोमवारी जाहीर करण्यात आले. यातील पंधरा अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदाच्या निवडी बिनविरोध झाल्या तर सात अभ्यास मंडळासाठी मतदान होऊन अध्यक्ष निवडण्यात आले.

शिवाजी विद्यापीठात एकूण २७ अभ्यास मंडळे आहेत. यांचे अध्यक्ष निवडण्यासाठीची अधिसूचना १३ फेब्रुवारी रोजी काढण्यात आली होती. त्यानुसार, सोमवारी प्रत्यक्ष निवडणूका होऊन निवड जाहीर करण्यात आली. त्यामध्ये डॉ. किशोर डी. कुठे (गणित अभ्यास मंडळ), डॉ. सुनील मधुकर गायकवाड (प्राणिशास्त्र), डॉ. मुणवल्ली गुरू रामचंद्र (स्थापत्य अभियांत्रिकी), डॉ. मनीष सुदेश भाटिया (औषध निर्माणशास्त्र), डॉ. केदार विजय मारूलकर (वाणिज्य), डॉ. शर्वरी शरद कुलकर्णी (व्यवस्थापन), डॉ. नंदकुमार लक्ष्मण कदम (लेखापरीक्षण), डॉ. पी. एस. कांबळे (व्यावसायिक अर्थशास्त्र), डॉ. तृप्ती किसन करेकट्टी (इंग्रजी), डॉ. जयवंत शंकरराव इंगळे (अर्थशास्त्र), डॉ. रवींद्र पांडुरंग भणगे (राज्यशास्त्र), डॉ. चंद्रवदन मोहनराव नाईक (इतिहास), डॉ. अर्चना राजकुमार कांबळे (समाजशास्त्र), डॉ. भरमू पारिसा मर्जे (शिक्षणशास्त्र), डॉ. निशा हरिलाल पवार (पत्रकारिता).



### या मंडळांसाठी झाले मतदान

सात अभ्यास मंडळांसाठी प्रत्यक्ष मतदान होऊन डॉ. एस. एस. कोळेकर (रसायन व रसायन तंत्रज्ञान), डॉ. प्रशांत प्रभाकर शाह (इलेक्ट्रॉनिक्स), डॉ. राजाराम विठोबा गुरव (वनस्पतीशास्त्र), डॉ. बाळासाहेब साऊबा जाधव (भूगोल व भूशास्त्र), डॉ. विजय राम घोरपडे (संगणकशास्त्र), डॉ. रणधीर शिंदे (मराठी), डॉ. सातप्पा शामराव सावंत (हिंदी) यांची निवड झाली.

### ५ अभ्यास मंडळे रिक्त

पाच अभ्यास मंडळांसाठी एकाही पात्र उमेदवाराने आपले नामनिर्देशन न भरल्याने अध्यक्षपदे रिक्त राहिली आहेत.

0 8 MAR 2023

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# १५ अभ्यास मंडळ अध्यक्ष निवडी बिनविरोध

## शिवाजी विद्यापीठ विद्या परिषद निवडणूक, ७ मंडळांसाठी मतदान, ५ पदे रिक्त

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील २७ अभ्यास मंडळांच्या अध्यक्षपदांसाठी दि. ६ मार्च रोजी निवडणुका झाल्या. यामध्ये १५ अभ्यास मंडळांच्या अध्यक्ष निवडी बिनविरोध झाल्या, तर ७ अभ्यास मंडळांसाठी मतदान घेण्यात आले.

अभ्यास मंडळांच्या निवडणुका होऊन अध्यक्षांची निवड जाहीर करण्यात आली. यातील डॉ. किशोर कुठे (गणित अभ्यास मंडळ), डॉ.



सुनील गायकवाड (प्राणीशास्त्र), डॉ. मुणवल्ली रामचंद्र (स्थापत्य अभियांत्रिकी), डॉ. मनीष भाटिया (औषध निर्माणशास्त्र), डॉ. केदार मारुलकर (वाणिज्य), डॉ. शर्वरी कुलकर्णी (व्यवस्थापन), डॉ. नंदकुमार कदम (लेखापरीक्षण), डॉ. पी. एस. कांबळे (व्यावसायिक अर्थशास्त्र), डॉ. तृप्ती करेकट्टी (इंग्रजी), डॉ. जयवंत इंगळे (अर्थशास्त्र), डॉ. रवींद्र भणगे (राज्यशास्त्र), डॉ. चंद्रवदन नाईक (इतिहास), डॉ. अर्चना कांबळे (समाजशास्त्र), डॉ. भरमू मर्जे (शिक्षणशास्त्र), डॉ. निशा पवार (पत्रकारिता) यांच्या बिनविरोध निवडी झाल्या, तर डॉ. एस. एस. कोळेकर (रसायन व रसायन तंत्रज्ञान), डॉ. प्रशांत शाह (इलेक्ट्रॉनिक्स), डॉ. राजाराम गुरव (वनस्पतीशास्त्र), डॉ. बाळासाहेब जाधव (भूगोल व भूशास्त्र), डॉ. विजय घोरपडे (संगणकशास्त्र), डॉ. रणधीर शिंदे (मराठी), डॉ. साताप्पा सावंत (हिंदी) यांच्या निवडी मतदानाने झाल्या. दरम्यान, पाच अभ्यास मंडळांसाठी एकाही पात्र उमेदवाराने नामनिर्देशन न भरल्याने ही अध्यक्षपदे रिक्त राहिली आहेत.

सकाळ

# अभ्यास मंडळांचे अध्यक्ष 'बिनविरोध'

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यास मंडळांच्या अध्यक्षपदांच्या निवडणुका सोमवारी पूर्ण झाल्या. शिवाजी विद्यापीठात एकूण २७ अभ्यास मंडळांचे गठण झाले आहे. या मंडळांचे अध्यक्ष निवडण्यासाठीची अधिसूचना १३ फेब्रुवारी २०२३ रोजी निर्गमित करण्यात आली होती. त्यानुसार, आज प्रत्यक्ष निवडणुका होऊन विविध अभ्यास मंडळांच्या अध्यक्षांची निवड जाहीर करण्यात आली. त्यात १५ अभ्यास मंडळांसाठी अध्यक्षांची निवड बिनविरोध झाली.



बिनविरोध निवड झालेल्या अध्यक्षांमध्ये डॉ. किशोर डी. कुचे (गणित अभ्यास मंडळ), सुनील गायकवाड (प्राणीशास्त्र), गुरू मुणवल्ली (स्थापत्य अभियांत्रिकी), मनिष भाटिया (औषध निर्माणशास्त्र), केदार मारूलकर (वाणिज्य), शर्वरी कुलकर्णी (व्यवस्थापन), नंदकुमार कदम (लेखापरीक्षण), पी. एस. कांबळे (व्यावसायिक अर्थशास्त्र), तृप्ती करेकट्टी (इंग्रजी), जयवंत इंगळे (अर्थशास्त्र), रविंद्र भणगे (राज्यशास्त्र), चंद्रवदन नाईक (इतिहास), अर्चना कांबळे (समाजशास्त्र), भरमू मर्जे (शिक्षणशास्त्र), निशा पवार (पत्रकारिता) यांचा समावेश आहे. सात अभ्यास मंडळासाठी सोमवारी प्रत्यक्ष मतदान होऊन अध्यक्षांची निवड करण्यात आली. त्यामध्ये डॉ. एस. एस. कोळेकर (रसायन व रसायन तंत्रज्ञान), प्रशांत शाह (इलेक्ट्रॉनिक्स), राजाराम गुरव (वनस्पतीशास्त्र), बाळासाहेब जाधव (भूगोल व भूशास्त्र), विजय घोरपडे (संगणकशास्त्र), रणधीर शिंदे (मराठी), साताप्पा सावंत (हिंदी) यांचा समावेश आहे.

**पाच मंडळांची अध्यक्षपदे रिक्त**

संख्याशास्त्र, भौतिकशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, मानसशास्त्र, यंत्र अभियांत्रिकी (मेकॅनिकल इंजिनिअरींग) या पाच अभ्यास मंडळांसाठी एकाही पात्र उमेदवाराने आपले नामनिर्देशन भरले नाही. त्यामुळे अध्यक्षपदे रिक्त राहिली आहेत. त्यातील संख्याशास्त्र विभागात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर भौतिकशास्त्र विभागामध्ये प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी काम केले आहे. त्यांच्याशी संबंधित या विभागांमधील अध्यक्षपद रिक्त राहिल्याची चर्चा होत आहे. संख्याशास्त्र, भौतिकशास्त्र मंडळातील सदस्य अध्यक्षपदाच्या प्रक्रियेत सहभाग झाले नाहीत. सूक्ष्मजीवशास्त्र, यंत्रअभियांत्रिकीमधील कोणी सदस्य पात्र ठरले नाहीत, तर मानसशास्त्रमध्ये सदस्य पात्र असून देखील अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल झाला नाही.

**अभ्यासमंडळे काय करतात?**

अभ्यासमंडळे संबंधित विद्याशाखेचा अभ्यासक्रम निश्चिती, रचना, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप ठरविणे आदी स्वरूपातील शैक्षणिक काम करतात. या मंडळात एकूण ११ सदस्य असतात. ते आपल्यापैकी एका सदस्याची अध्यक्षपदी निवड करतात.